



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे     सहसंपादक : तुकाराम कामठे






वर्ष ५ । अंक १६७ । शुक्रवार २० मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322

























## दै. आकर्षण निवडक

### अवैध माती उत्खनन उघड केल्याने सामाजिक कार्यकर्ते रोडे यांना धमक्या



अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील के. के. रेंज (आर्मी प्रशिक्षण) परिसरातून सुरू असलेल्या अवैध माती उत्खननाचा पर्दाफाश केल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते तथा अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांना फोनवरून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याची गंभीर घटना समोर आली आहे. याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी रोडे यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ढवळपुरी येथील के. के. रेंज भागातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या माती उत्खनन करून ३० ते ४० वाहनांच्या माध्यमातून वाहतूक सुरू असल्याची तक्रार अरुण रोडे यांनी १६ मार्च २०२६ रोजी केली होती. या तक्रारीनंतर त्यांनी सलग तीन दिवस सकाळी ६ ते ९ या वेळेत संबंधित ठिकाणी जाऊन व्हिडिओ चित्रीकरण केले. तसेच या प्रकरणाचे पुरावे माध्यमांना देऊन बातमी प्रसिद्ध करण्यात आली. दरम्यान, १८ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १.४६ वाजता रोडे पारनेरकडे जात असताना त्यांच्या मोबाईलवर (क्रमांक ७४९९४८९०९३) फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने सुरुवातीला भेटण्याची इच्छा व्यक्त केली, मात्र नंतर शिवीगाळ करत स्वतःला एका धनदांडग्या व्यक्तीचा मुलगा'' असल्याचे सांगत धमक्या दिल्या. ''तू माझ्या गाड्यांचे चित्रीकरण का केले, बातमी का दिली? तुझा कायमचा बंदोबस्त करतो, १५ मिनिटांत येतो,'' अशा शब्दांत त्याने धमकी दिल्याचा आरोप रोडे यांनी केला आहे. याचबरोबर संबंधित व्यक्तीने आपल्या वडिलांचे राजकीय संबंध असल्याचा दावा करत पोलीस व महसूल यंत्रणेलाही आपण 'हप्ते' देतो, त्यामुळे कोणी काही करू शकत नाही, असा गर्विष्ठ इशाराही दिल्याचे रोडे यांनी निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणी रोडे यांनी संबंधित मोबाईल क्रमांकाचा कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) तपासण्याची मागणी केली असून, या व्यक्तीचे माती माफियांशी संबंध असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच आपल्याला व आपल्या कुटुंबीयांना जीविताचा धोका निर्माण झाल्याने तात्काळ संरक्षण देण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

### अहिल्यानगरात अमेरिका-इस्राईलविरोधात निषेध आंदोलन

अहिल्यानगर - मध्यपूर्वेत कोणत्याही ठोस कारणाशिवाय युद्ध लादल्याचा आरोप करत जागतिक मानवसमाजाच्या वतीने अहिल्यानगर येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दिल्लीगेट परिसरात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने अमेरिका आणि इस्राईल या राष्ट्रांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. आंदोलनादरम्यान आंदोलकांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या प्रतिमांना जोडे मारून त्या पायाखाली तुडवत संताप व्यक्त केला. ''ट्रम्प मुर्दाबाद'', ''नेतन्याहू मुर्दाबाद'', ''भारत माता की जय'' आणि ''वंदे मातरम'' अशा घोषणांनी संपूर्ण दिल्लीगेट परिसर दणाणून गेला. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, वीरबहाद्दूर प्रजापती, सचिन कुक्कडवाल, संतोष खामकर,ओम कदम,पोपट शेळके, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, पोपट भोसले, धनंजय मडके, कैलास पठारे, अशोक भोसले आदी मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान ॲड. कारभारी गवळी यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदविताना सांगितले की, अमेरिका आणि इस्राईलच्या आक्रमक धोरणांमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. या युद्धाचे परिणाम केवळ मानवजातीपुरते मर्यादित राहणार नसून संपूर्ण सजीव सृष्टीवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

# घरगुती गॅसचा सध्या तरी कुठलाही तुटवडा नाही; ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये – बबनराव भुसारी

दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**शिर्डी–** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या युद्धाची झळ जगातील सर्वच देशांपर्यंत पोहोचली असून भारतात देखील इराण अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचा तुटवडा निर्माण होतो की काय अशा भीतीने ग्राहकांनी कधी पेट्रोल पंपासमोर तर कधी गॅस एजन्सी समोर लांबच लांब रांगा लावण्यास सुरुवात केल्याने वितरक आणि कर्मचाऱ्यांवर मात्र कामाचा ताण वाढल्याचे दृश्य आहे परंतु गॅस तुटवड्याबाबत शिर्डीतील हिंदुस्तान पेट्रोलियम च्या साई गणेश गॅस एजन्सीचे मुख्य वितरक बबनराव भुसारी यांनी स्पष्टीकरण देत घरगुती गॅस चा सध्या तरी कोणताही तुटवडा नसून कंपनीकडून पूर्वी प्रमाणेच पुरवठा सुरू आहे ग्राहकांनी अफवांवर विश्वास न ठेवता नेहमीप्रमाणे गॅस भरावा असे आवाहन केले आहे

सरकारने युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेऊन आधीच उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी व्यावसायिक सिलिंडर पुरवठ्याला बंदी घातली आहे. सध्या गॅस बुकिंग केल्यानंतर तीन ते पाच दिवसांच्या आत सिलिंडर घरपोच दिला



जात आहे. त्यापुढील बुकिंग २५ ते ३० दिवसांनी करता येते. युद्धजन्य परिस्थितीच्या आधी घरात चालू असलेला गॅस सिलिंडर संपत आल्यावर दुसरा मोकळा सिलिंडर भरला जात होता. मात्र, मागील काही दिवसात पुढील काळात पुरवठा बंद होईल, या भीतीने घरातील मोकळा सिलिंडर भरण्यासाठी ग्राहक वितरकांकडे गर्दी करत आहेत. याशिवाय अधिकृत नोंदणी नसलेल्या ग्राहकांनीही यात भर घातली आहे. तेही सिलिंडर मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. ज्यांच्याकडे सिलिंडर शिल्लक आहे, तेही आगाऊ साठा करण्यासाठी वितरकांच्या गोदामांबाहेर गर्दी करत आहेत. आज गुढीपाडवा असताना देखील शिर्डीतील साई गणेश गॅस एजन्सी समोर ग्राहकांनी भल्या सकाळीच मोठ्या रांगा लावत गॅस सिलिंडर घेण्यासाठी गर्दी केल्याचे चित्र दिसून आले.

याबाबत साई गणेश गॅस एजन्सीचे बबनराव भुसारी यांनी ग्राहकांना एजन्सी वर गर्दी करू नये असे आवाहन करत लवकरच घरपोहोच सिलिंडर सुद्धा सुरू होणार असल्याचे सांगितले असून ज्यांची इ केवायसी झाली नसेल,आधार कार्ड ला लिंक केले नसेल किंवा इतर कोणत्याही अडचणी असतील तर अशा ग्राहकांनी घरी सिलिंडर घेऊन येणाऱ्या कर्मचाऱ्यांशी अथवा साई गणेश गॅस एजन्सी च्या कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन केले असून ग्राहकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही बांधिल असल्याचे भुसारी यांनी सांगितले

त्याचप्रमाणे व्यावसायिक गॅस टाक्या मिळत नसल्याने शिर्डीतील हॉटेल चालकांना देखील मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे मात्र सिन्नरच्या गॅस प्लांटवर गेल्या पाच तारखेपासून साई गणेश गॅस एजन्सी चे वाहन रिकामे व्यावसायिक सिलेंडर घेऊन पैसे भरून उभे आहे जेव्हा कधी व्यावसायिक गॅस सिलिंडर सुरू होतील तेव्हा सर्वप्रथम शिर्डीचे वाहन प्राधान्याने भरून मिळेल असा आशावाद यावेळी बबनराव भुसारी यांनी व्यक्त केलाय.

## शिर्डीत प्रथमच खास महिलांसाठी एस एस योगा क्लासेसचे युवानेते डॉ.सुजय विखेंच्या हस्ते उद्घाटन




दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**शिर्डी–** मराठी नववर्ष गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर खास महिलांसाठी शिर्डीत एस एस योगा क्लासेस चा शुभारंभ महाराष्ट्र भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष युवानेते डॉ सुजय विखे पाटील यांच्या हस्ते व मोठ्या संख्येने आलेल्या मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. शिर्डी नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सौ सुनीताताई वसंत गोंदकर, सौ स्वातीताई संतोष गोंदकर व योगा टीचर सौ पूजा ताई सुनील गोंदकर यांच्या पुढाकाराने महिला भगिनींच्या आग्रहास्तव फक्त महिलांसाठी योगा क्लासेस सुरू झाल्याने प्रभाग क्रमांक दोन मधील महिला भगिनींसाठी मोठी सुवर्णसंधी उपलब्ध झाल्याचे डॉ सुजय विखे पाटील यांनी म्हटले असून आपल्या भाषणादरम्यान डॉ सुजय विखे पाटील यांनी नेहमीच्या मिश्किल शैलीत योगा शिक्षिका पूजा गोंदकर यांना व्यवसाय कसा करावा व कोणता योगा आधी घ्यावा याबाबत सांगत दिलेला सल्ला ऐकून शिक्षिका पूजा गोंदकर ह्या देखील आश्चर्यचकित झाल्या व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोठे प्रस्थ असलेल्या सुजय दादांचा योगा बाबत देखील अभ्यास पाहून मला सुद्धा आश्चर्य वाटल्याचे त्यांनी सांगत डॉ सुजय विखे पाटलांचे विशेष कौतुक केले.

याप्रसंगी नगराध्यक्षा सौ जयश्रीताई थोरात,प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते,उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके यांसह सर्व नगरसेवक ,नगरसेविका व परिसरातील महिला भगिनींनी मोठ्या संखेने उपस्थिती लावली.

## पाटील हॉस्पिटल येथील अत्याधुनिक एक्स रे मशीनचे उद्योजक रोहन मांडे यांच्या हस्ते उद्घाटन



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील प्रसिद्ध अस्थी विकार तज्ञ डॉक्टर विजय पाटील यांच्या पाटील हॉस्पिटल मध्ये फुजीफिल्म या कंपनीचे अत्याधुनिक एक्स रे मशीन बसविण्यात आले आहे.

सदर अत्याधुनिक मशीन चे उद्घाटन पाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगर शहरातील प्रसिद्ध व्यावसायिक श्री रोहन मांडे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर एक्स रे मशीन जगातील सर्वोत्कृष्ट पैकी एक समजली जाते व अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच ही सुविधा एखाद्या खाजगी रुग्णालयात उपलब्ध झाली आहे.

उत्कृष्ट प्रतीचे एक्स रे कमी वेळात काढण्यासाठी ही मशीन कामी येते. गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर विजय पाटील यांनी केले.

## अवकाळी पावसाचा पैठण तालुक्याला तडाखा; गहू-डाळिंब पिकांचे मोठे नुकसान



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**पैठण–** तालुक्यातील कडेठाण, पारुडी, राजापूर, पिंपरी राजा, आडुळ व परिसरात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. कापणीस आलेल्या गव्हाच्या पिकांसह डाळिंब बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अचानक झालेल्या पावसामुळे शेतातील गहू आडवा पडला असून कणसांमध्ये पाणी साचल्याने धान्याची गुणवत्ता घसरली आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दुसरीकडे डाळिंब बागांमध्ये फळगळ, फळांना तडे जाणे व रोगराई वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून, आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांपुढे नव्या संकटाची भर पडली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पिके उभी केली होती, मात्र अवकाळी पावसाने सर्व गणितच बिघडवले आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचा तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. तसेच पीक विमा योजनेंतर्गत दावे लवकरात लवकर मंजूर करावेत, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रशासनाने तत्काळ पाहणी करून नुकसानाचा अहवाल शासनाकडे सादर करावा व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.

## गुढी पाडव्यानिमित्त डोंबिवलीतील नववर्ष स्वागत यात्रेत एक खास आकर्षण ठरले ते नेहरू मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी

**विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारली आहे – रविंद्र चव्हाण, भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष**



दैनिक आकर्षण | प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** डोंबिवलीतील नववर्ष स्वागतयात्रेचे यंदाचे २८ वे वर्ष होते. आपल्या हिंदू संस्कृतीच्या नव्या वर्षाची सुरुवात मंगलमय व्हावी आणि तरुण पिढीला आपल्या भारतीय संस्कृतीशी नाते टिकवून ठेवावे या उद्देशाने ही संकल्पना सांस्कृतिक डोंबिवलीत शहरातून श्री गणेश मंदिर संस्थानाच्या माध्यमातून सुरु झाली आणि याचा एक डोंबिवलीकर म्हणून कायमच अभिमान वाटतो, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. या संकल्पनेचे श्रेय आबासाहेब पटवारी आणि सुधीर जोगळेकर या भाजपा संघ परिवारातील डोंबिवलीकरांना असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

या वर्षीचे अजून एक खास आकर्षण ठरले ते म्हणजे नेहरू मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. त्याच बरोबर डोंबिवलीतील शोभायात्रेत यावर्षी दोन ठळक गोष्टींनी लोकांचे लक्ष वेधले वंदे मातरम् या राष्ट्रगानाचे शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी (१५०वे) वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी (१००वे) वर्ष यावर आधारित डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने २ चित्ररथ साकारले होते.

हे चित्ररथ यंदाच्या स्वागतयात्रेचे विशेष आकर्षण ठरले. यामुळे यंदाच्या स्वागतयात्रेत डोंबिवलीच्या सांस्कृतिक संचितासोबतच राष्ट्रीयत्वाच्या विचारधारेचेही दर्शन घडले. हा दुर्मिळ असा दुग्ध शर्करा योग आल्याने यंदा डोंबिवलीकर परिवाराने याच राष्ट्रीयत्वाच्या विषयाला अनुसरून चित्ररथ साकारले.

वंदे मातरमचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव आणि रास्व संघाच्या पंचसूत्रीवर आधारित चित्ररथाच्या संकल्पनेला अपेक्षेनुसार डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली. तसेच यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना राबवली त्यास डोंबिवलीकरांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. ''क्रांतिकारी देशसेवक'' या संकल्पनेवर आधारित वेशभूषा स्पर्धा झाली. त्यामध्ये ५ वर्षांच्या चिमुकल्यांपासून ७५ वर्षांच्या आजी आजोबांपर्यंत आबालवृद्धांनी सहभाग घेतला. विजेत्यास २५,००० रुपयांची रोख रक्कम देण्यात आले तर उपविजेत्यास १५,००० त्याचबरोबर अन्य पारितोषिके देण्यात आली.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### रेडिओ सिटीतर्फे डॉ. उद्धव शिंदे यांचा सामाजिक कार्याबद्दल सन्मान




अहिल्यानगर - स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल चैत्र पाडवा निमित्त सावेडी येथे रेडिओ सिटी ९१.१ एफएमच्या वतीने सन्मान करण्यात आला. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते डॉ. शिंदे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. समाजातील वंचित घटकांसाठी, विद्यार्थ्यांसाठी तसेच पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी रेडिओ सिटीचे आरजे चैत्राली आणि आरजे प्रसन्न उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. शिंदे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### शिरसगाववरखेड रस्ता तातडीने दुरुस्त करा



अहिल्यानगर- नेवासा तालुक्यातील शिरसगाव ते वरखेड हा मुख्य रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार, पायी चालणारे भाविक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अपघाताची शक्यता कायम निर्माण होत असल्याने हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा बुधवार दि. ०१ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ वाजता खडका फाटा (नेवासा) येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.याबाबत सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हाधिकारी व उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नेवासा यांना निवेदन देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, नेवासा तालुक्यातील वरखेड येथे दरवर्षी हनुमंत जयंतीपासून वरखेड देवीची यात्रा सुरू होते. यंदा सोमवार दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजता होम असून ०७ एप्रिल रोजी मुख्य यात्रा पार पडणार आहे. याच दिवशी सकाळी ११ वाजता पैठणची मानाची पालखी वरखेड गावात दाखल होते. ही पालखी वांबोरी येथील जुगा बाबा पोतराज येथून निघून पैठण येथे मुक्काम करून वरखेड येथे येते. वरखेड देवी ही महाराष्ट्रातील मातंग समाजाचे कुलदैवत मानली जाते आणि नवसाला पावणारी देवी म्हणून ती जगप्रसिद्ध आहे. यात्रेदरम्यान सर्व जातीधर्मातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. या यात्रेत सुमारे ५ ते ६ लाख भाविक उपस्थित राहतात, त्यापैकी सुमारे ९० टक्के भाविक मातंग समाजातील असतात. मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, अहिल्यानगर, नाशिक, सुरत, धुळे, जळगाव, औरंगाबाद आदी विविध जिल्ह्यांतून भाविक रिक्षा, तीनचाकी, चारचाकी, टेम्पो, ट्रक तसेच एस.टी. बसमधून वरखेड येथे येतात. मात्र गावात भाविकांसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अनेक ग्रामस्थ व शेतकरी आपल्या जागेत तारकंपाउंड करून वाहन पार्किंगसाठी ५०० ते २००० रुपयांपर्यंत भाडे आकारत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांची आर्थिक लूट होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने या प्रकाराकडे लक्ष देऊन भाविकांकडून आकारले जाणारे भाडे नियमानुसार निश्चित करावे तसेच यात्रेपूर्वी

# अहिल्यानगरात २५ टक्के पाणीपट्टी कपातीचा निर्णय दिशाभूल करणारा – काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण

**‘ठराव रद्द केल्याशिवाय २५% कपात शक्य नाही; स्थायी समिती सभापती व सदस्य केवळ सवंग लोकप्रियतेसाठी बेकायदेशीर घोषणाबाजी करत आहे’**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महापालिकेच्या स्थायी समितीने जाहीर केलेली पाणीपट्टी २५ टक्के कपात ही पूर्णपणे दिशाभूल करणारी असल्याचा आरोप काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी केला आहे. वाढीव पाणीपट्टीचा मूळ ठराव रद्द न करता कपात जाहीर करणे हे कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दीप चव्हाण म्हणाले की, आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रशासकीय कार्यकाळात जनरल बोर्डाच्या बैठकीत अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत घरपट्टी आणि पाणीपट्टी वाढीचा ठराव मंजूर करण्यात आला आणि नगरकरांवर आर्थिक बोजा टाकण्यात आला. त्यानंतर आता अचानक २५ टक्के कपातीची घोषणा करून नागरिकांना खुश करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण ही सपशेल दिशाभूल आहे. असा आरोप दीप चव्हाण यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, पूर्वी पाणीपट्टी सुमारे १५०० रुपये असताना ती थेट २४०० रुपयांपर्यंत वाढवण्यात आली. त्या अगोदर अहमदनगर महानगरपालिका स्थापना वेळी पाणीपट्टी ८०० रुपये होती . तत्कालीन प्रशासक, पालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी राजगोपाल देवरा यांनी हा निर्णय घेतला होता . त्यानंतर २०१६ मध्ये पालिकेला लाभलेले दुसरे प्रशासक तथा जिल्हाधिकारी



राहुल द्विवेदी यांनी प्रशासकीय अधिकार वापरून ८०० रुपयाची पाणीपट्टी पंधराशे रुपये वर नेऊन ठेवली. आता १२ मार्च २०२५ रोजी तिसरे प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी २४०० रुपये करण्याचा प्रताप केला. त्यावेळचा महासभा क्रमांक, प्रशासकीय ठराव क्रमांक १०८ दिनांक १५ जानेवारी २०२५ हा ठराव मंजूर करण्यात आला. हा देखील बेकादेशीर असताना शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी पत्रक काढून वृत्तपत्रात बातम्या देऊन याला विरोध केला. हा ठराव विखंडित करण्याची मागणी त्यावेळी देखील केली होती. अर्थसंकल्पात याची तरतूद नव्हती तरी नागरिकांनी ही वाढीव रक्कम भरल्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे ७ ते ७.५ कोटी रुपयांची भर पडत आहे. अशा परिस्थितीत कपातीची घोषणा ही बेकायदेशीर आहे. ही घोषणा केवळ दिखावा असल्याचे त्यांनी म्हटले.

तसेच त्यावेळी झालेल्या सभेच्या इतिवृत्तामध्ये आयुक्तांनी फक्त ठराव मांडला व तो बहुमताने मंजूर झाला असे दाखवण्यात आले. पण त्याचे खंडन किंवा समर्थन याबाबत उपस्थितांचे मत मतांतर याचा उल्लेख येथे कुठेही नाही. त्यावेळी जो पालिकेचा सन २०२३ – २४ चा अर्थसंकल्प मंजूर झाला ते वार्षिक ताळेबंद नफा तोटा पत्रक न सादर करता केवळ साध्या कागदावर निबंध लिहिल्यासारखा अर्थसंकल्प मांडण्यात आला. चव्हाण यांनी पुढे नमूद केले की, महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५१ नुसार मूळ प्रशासकीय ठराव विखंडित केल्याशिवाय कोणतीही कपात करता येत नाही.

स्थायी समिती व महासभा अर्थसंकल्प सभा यामध्ये विषय पत्रिकेवर २५ टक्के पाणीपट्टी कपात शिफारशी बाबत कोणताही विषय नसल्यामुळे अशा प्रस्तावावर चर्चा अथवा निर्णय करता येत नाही. तसेच, स्थायी समितीने आधीच अर्थसंकल्प मंजूर केलेला असताना महासभेला स्वतंत्रपणे पाणीपट्टी कमी करण्याचा अधिकार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पालिका पदाधिकाऱ्यांना जर खरोखरच २५ टक्के पाणीपट्टी कमी करायचे असेल तर त्यांनी अगोदरच स्थायी समितीमध्ये पाणीपट्टी २४०० रुपयांवरून १८०० रुपये करण्याबाबतचा निर्णय घेऊन त्याची प्रशासकीय मंजुरी घेऊन तो ठराव स्थायी समितीमध्ये मंजूर करून नंतर तो महासभेकडे मंजुरीसाठी पाठवणे आवश्यक होते. परंतु तसे न करता फक्त बोल घेवडेपणा करून महापौरांच्या महासभे समोर हा विषय थातुर मातुर पद्धतीने ठेवण्यात आला. असा आरोप त्यांनी केला आहे चव्हाण यांनी सांगितले की, १५ जानेवारी २०२५ रोजीच्या महासभेत ठराव क्रमांक १०८ मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर १२ मार्च रोजी एका तासात महासभा आणि स्थायी समिती घेऊन वाढीव पाणीपट्टी लागू करण्यात आली. मात्र त्यावर्षीच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात अपेक्षित ३५.३१ कोटी रुपयांऐवजी केवळ ३० कोटींची तरतूद दाखवण्यात आली, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. ‘‘त्या वेळीही आम्ही लेखी आक्षेप नोंदवला होता. आता पुन्हा कपातीच्या नावाखाली नागरिकांची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे आधी वाढीव पाणीपट्टीचा ठराव रद्द करावा आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घ्यावा,’’ अशी मागणी दीप चव्हाण यांनी केली आहे. तसेच नागरिकांनी यावर्षी आलेले पाणीपट्टीचे बिल अदा करायचे की नाही किंवा कोणत्या दराने पाणीपट्टी भरावी याबाबत स्थायी समिती सभापती व सदस्यांनी खुलासा करावा असे त्यांनी म्हटले आहे.

## ढवळपुरी अत्याचार प्रकरणी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी; महिला राष्ट्रवादी काँग्रेसचे निवेदन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून या प्रकरणातील आरोपीला कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. याबाबत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन पारनेर यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ढवळपुरी येथे अल्पवयीन मुलीवर झालेली अत्याचाराची घटना अत्यंत संतापजनक असून समाजात भीती व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच पीडित मुलीला आवश्यक वैद्यकीय, मानसिक व कायदेशीर मदत उपलब्ध करून द्यावी आणि या प्रकरणाचा जलदगती न्यायालयात खटला चालवून तिला लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर महिला अध्यक्षा सुषमा रावडे, जिल्हा उपाध्यक्ष सोनाताई चौधरी, युवती अध्यक्षा अपर्णा खामकर, युवती कार्याध्यक्ष सोनाली कुलथे व महिला शहराध्यक्षा कविता औटी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन आरोपीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## रमजान ईद नंतर शहरातून सुफी संत ख्वाजा गरीब नवाज दर्शन यात्रेचे आयोजन

**२७ मार्च रोजी शहरातून होणार थेट अजमेरला रवानगी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** रमजान ईद नंतर शहरातून २७ मार्च रोजी सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन हसन चिश्ती (गरीब नवाज) यांच्या दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. अजमेर (राजस्थान) ला जाण्यासाठी शहरातून कौटुंबिक धार्मिक यात्रेची संधी भाविकांना उपलब्ध होणार असून, हे ७ दिवसीय यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. यानंतर देखील एप्रिल, मे व जून महिन्यात या यात्रेचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रेचे समन्वयक फजल शेख यांनी दिली.

शहरातून थेट अजमेरला जाण्यासाठी रेल्वे अथवा खासगी वाहनांची पुरेशी सुविधा नसल्याने शहरातून विशेष खासगी लक्झरी (स्लिपर) बसने जाण्याची सोय करण्यात आलेली आहे. २७ मार्च रोजी ही दर्शन यात्रा शहरातून निघणार असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या यात्रेत अजमेर शरीफ, शरवाड शरीफ, टाटोटी शरीफ, कपासन शरीफ, चितोड गड, जावरा, चाळीस गाव, धुलिया येथील धार्मिक स्थळांना भेट दिली जाणार आहे. या यात्रेत भाविकांची नाश्ता, जेवण, राहण्याची व्यवस्था अल्पखर्चात सेवाभावाने करण्यात आली आहे. या यात्रेत प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य राहणार असल्याने अधिक माहिती व नोंदणीसाठी ८०८७७४२८१८ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

## भाळवणी परिसरात गारपिटीसह अवकाळी पाऊस; गहू–कांदा पिकांचे मोठे नुकसान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**भाळवणी–** भाळवणी, हिवरे कोरडा, गोरेगाव, ढवळपुरी, भनगडेवाडी आदी परिसरात अचानक झालेल्या गारपिटीसह अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या गारपिटीमुळे विशेषतः गहू व कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती स्थानिक शेतकऱ्यांकडून मिळत आहे.

सध्या बाजारात शेतमालाला योग्य भाव मिळत नसताना निसर्गाच्या या संकटामुळे शेतकरी अधिकच अडचणीत सापडला आहे. गारपिटीमुळे शेतात उभे असलेले गहू आडवे पडले असून कांदा पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे कष्ट एका रात्रीत वाया गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

भाळवणी परिसरातील शेतकरी नेते मारुतीराव रोहकले यांनी या नुकसानीबाबत माहिती देताना सांगितले की, गारपिटीमुळे गहू व कांदा पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या अवकाळी पावसामुळे संपूर्ण भाळवणी परिसरातील शेतकरी चिंतेत असून शासनाकडून त्वरित मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ‘‘श्रृंखला रसवंतीगृह’’ इनर व्हिल क्लबच्या माध्यमातून येरवडा खुले कारागृहाच्या श्रृंखला कॅन्टीनमध्ये रसवंतीगृहाचे उद्घाटन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**पुणे** – बंदयांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी परिणामकारक उपक्रमांतर्गत, इनर व्हिल क्लब – पुणे रिव्हर रिदम्स व पुणे प्लॅटिनम यांनी, रिव्हरसाईड, इम्पीरियल, पुणे सेंट्रल, पुणे विंग्स, बाणेर हिल्स यांच्या सहकार्याने येरवडा ओपन जेल कॅन्टीन श्रृंखला उपहारगृह येथे श्रृंखला रसवंतीगृह उभारणीसाठी मोलाचे सहकार्य करून उसाचा रस काढण्याची मशीन भेट दिली. सदर भेट देऊन च्या सर्व टिमने बंदयांच्या सुधारणा व पुनर्वसनात मदत करून कारागृह प्रशासनाला मोलाचे सहकार्य केले आहे. या कार्यक्रमासाठी भारत विकास परिषद, स्वारगेट शाखा अध्यक्षा सौ. सुषमा कोंडे यांची खूप मदत झाली. मा. डॉ. श्री सुहास वारके (भा.पो.से.) सुपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच मा.श्री. सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली आज दिनांक १८.०३.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता येरवडा खुले कारागृहाचे श्रृंखला कॅन्टीन, कॉमरझोन येथे ‘‘श्रृंखला रसवंतीगृहाचे’’ उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी श्रीमती सुषमा कोंडे, इनर व्हिल व भारत विकास परिषद, श्रीमती रिचा बंन्सल, श्रीमती कल्पना बोरा व इतर मेंबर्स, श्री शामकांत शेडगे, कारागृह अधीक्षक, श्री मनोहर बिलोरे, कार्यालयीन अधीक्षक, दादा, श्रीमती निशा श्रेयकर, तुरूंग अधिकारी श्रेणी–२, श्रीमती रतन खिलारी, तुरूंग अधिकारी श्रेणी–२, श्री खोमणे दादा, येरवडा जेल प्रेसचे व्यवस्थापक श्री आढाव साहेब, श्री राहुल कडू, हवालदार श्री दत्ता मोडक, शिपाई संतोष जाधव, अविनाश पवार व इतर कर्मचारी, पत्रकार, बंदी उपस्थित होते.

## ढवळपुरी अत्याचार प्रकरणी आ. दातेंचा विधानसभेत संतप्त आवाज

**आरोपीस कठोर शिक्षा व जलदगती न्यायालयात खटला चालवा!**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अमानुष अत्याचार प्रकरणी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी विधानसभेच्या अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करत ठाम व आक्रमक भूमिका मांडली.

अधिवेशनात बोलताना आमदार दाते सर यांनी संबंधित घटनेचा घटनाक्रम सभागृहासमोर मांडताना सांगितले की, ढवळपुरी गावातील दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष असलेला कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना १० मार्च २०२६ रोजी उघड झाली असून सबंधित मुलगी आठवीत शिकत असून आरोपीने पिडीत मुलीच्या कुटुंबाला ठार मारण्याची धमकी देत गेल्या तिन वर्षांपासून तिच्यावर सातत्याने अत्याचार करत आलेला आहे.

यापूर्वी मी दोन हाफमर्डर केले असल्याचे सांगत तु कुणालाही सांगितले तरी तुझ्या आईवडिलांना व भावाला मारून टाकीन अशी भीती दाखवत सबंधित आरोपीने ढवळपुरी व परिसरातील काही महिला व युवतींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून व पैशाचे आमिष दाखवून त्यांच्यावर अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या तथाकथित महाराजाने चार विवाह




मानसिक व शारीरिक छळ सहन करावा लागला. आरोपीने तिला धमकावून गेली तिन वर्ष हा प्रकार लपवून ठेवला, मात्र अखेर धैर्य एकवटून पीडितेने घडलेला प्रकार उघड केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. या घटनेनंतर ढवळपुरी गावासह संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. ‘‘अशा विकृत प्रवृत्तीला कोणतीही माफी नाही. संबंधित आरोपीवर कठोरात कठोर कारवाई होऊन त्याला कडक शिक्षा झाली पाहिजे

> **मागील आठवड्यात कान्हूर पठार येथिल दोन अल्पवयीन बहिणींवर अत्याचार झाल्याची घटना घडलेली असतानाच पुन्हा ही घटना घडलेली आहे. पारनेर तालुक्यात सध्या महिलावरील अत्याचाराच्या घटनांत वाढ झाली असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांतील आरोपींच्या विरोधात जलदगती न्यायालयात खटले चालवून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे.**
>
> **– आमदार काशिनाथ दाते सर**

केलेले असून घटना घडली त्या दिवशी सबंधित आरोपीने या अल्पवयीन मुलीला घरी बोलावून तिला बांबू व इतर साधनाने मारहाण केली. एवढ्यावरच तो थांबला नाही तर स्वयंपाक करण्याची पक्कड गरम करून त्याचे चटके तिला दिले आहे ज्यामुळे त्या मुलीला चालणेही अवघड झाले आहे.

दरम्यानच्या काळात पीडितेला आणि पीडितेला तातडीने न्याय मिळावा यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा, अशी ठोस मागणीही त्यांनी केली. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून अशा घटनांवर कडक कायदेशीर कारवाई करणे गरजेचे असल्याचे ठाम मत आमदार दाते यांनी यावेळी व्यक्त केले.

# सृष्टीचा सृजनकर्ता ब्रह्मदेवाने गुढीपाडव्याला सृष्टीची निर्मिती केल्याने हा मुहूर्त चांगला - अशोकदादा जाधव महाराज

## श्री स्वामी समर्थ मंदिरात सहस्त्र कलश अभिषेक संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सृष्टीचा सृजनकर्ता करता असलेल्या ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती चैत्रप्रतिपदे पासून केली, हा दिवस साडेतीन मुहूर्तापैकी एक समजला जातो.आज श्री.स्वामी समर्थ यांना सहस्त्र कलश अभिषेक करण्याचा अमृतयोग लाभला हे माझे भाग्य समजतो. गुढीपाडव्याच्या दिवशी सृष्टीची उत्पत्ती झाल्याने या दिवशी सूर्य, चंद्र व संपूर्ण राशीचक्र प्रारंभीच्या ठिकाणापासून भ्रमण सुरू करतात.भारतीय ज्योतिष शास्त्रानुसार गुढीपाडवा हा साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक आहे.असे निरूपण केडगाव येथील शंकर महाराज मठाचे अशोकदादा जाधव महाराज यांनी केले.

सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिराचा २० वा वर्धापन दिन व प्रकट दिना निमित्त गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अशोकदादा जाधव महाराज यांनी गुरुवारी सहस्त्र कलश अभिषेक केला यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांना गुढीपाडव्याचे महत्त्व विशद करून भारतीय संस्कृतीमधील भक्तीयुक्त धारणेनुसार विजय व यशाचे सर्व श्रेय नेहमीच निसर्ग अथवा परमेश्वराला दिले जाते म्हणूनच यशासाठी परमेश्वराच्या प्रती लीन होऊन गुढी उभारण्याची प्रथा आहे. असे त्यांनी सांगितले.

गुरुवारी सकाळी श्री स्वामी समर्थ मूर्तीला जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर हवंना ची उदी, हळद, कुंकू एकत्र करून मूर्तीस स्नान घालण्यात आले.अकरा लिटर दुधात,सव्वा किलो साखर, एक किलो मध, एक किलो दही, एक किलो आम्रखंड, एक किलो गावरान तूप एकत्रित करून पुन्हा दुध स्नान घालण्यात आले. या अभिषेकानंतर सात किलो गुलाबांची फुले वापरून स्वामींना फुलांच्या पाकळ्यांमध्ये गुंफण्यात आले गुलाबी रंगाच्या फुलात स्वामींची मूर्ती तेजोमय दिसत होती. हे आकर्षक रूप पाहण्यासाठी मंदिरात भाविकांनी गर्दी करून दर्शनाचा लाभ घेतला. दुपारी नववर्षानिमित्त होमहवन करण्यात आले.यावेळी दश सहस्त्र ओम श्री स्वामी समर्थ नमो नमः या नामजपा मधे हवनाचा कार्यक्रम पार पडला.आरती होऊन प्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

# चिंचपुर पांगुळ येथे दरोड्याच्या टोळीतील सहा आरोपींच्या एलसीबीने आवळल्या मुस्क्या

## १० लाखांचा मुद्देमाल जप्त, चौघे फरार, आरोपींना आश्रय देणाऱ्यालाही पोलिसांनी केले सहआरोपी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील चिंचपुर पांगुळ येथे दरोडा टाकणाऱ्या टोळीचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. यावेळी सहा जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १० लाख ७१ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम , एक चाकु, एक गलोर, एक लोखंडी कंजी, एक लोखंडी कटावणी, एक भाला असा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

बदाम कडू काळे (वय २२, रा. शिरोडी, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर), साईनाथ विष्णु चव्हाण (वय २२, रा. मुडदे वडगाव, ता. गंगापुर), ऋतिक हसनमुख चव्हाण (वय २०, रा. खोसपुरी, ता.नगर, जि.अहिल्यानगर), महेश नंदु काळे (वय २०, रा. खोसपुरी, ता.नगर), भैय्या कडु काळे (वय २०, रा. शेकटा, ता. गंगापुर), लाकर करमत काळे (वय २६, रा. शेकटा, ता.गंगापुर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर अन्य चार जण फरार आहेत.





### दरोड्यातील आरोपींना आश्रय देणारा संजय आव्हाड झाला सहआरोपी

**दरोडया सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींना संजय आव्हाड याने मजले चिंचोली येथे आश्रय दिला होता. आव्हाड याच्या वस्तीवर हे आरोपी गुन्ह्यानंतर त्यांच्या गंगापुर येथे वास्तव्य न करता आव्हाड याच्या वस्तीवर आश्रय घेत असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी संजय आव्हाड याला सहआरोपी केले आहे.**

चिंचपुर पांगुळ येथील मळईवस्ती येथे राहणाऱ्या दगडू भिमराज बडे यांच्या घराचा कडी कोयडा तोडून दरोड टाकण्यात आला होता. ही घटना दि. १८ रोजी मध्यरात्री घडल्याने पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा हा कोणी केला असावा या बाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी छडा लावला असता सदरचा गुन्हा हा बदाम काळे याने यापुर्वी अन्य ठिकाणी केला असल्याचे पुढे आला तसेच तो हा मजले चिचोली येथे असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली.

# आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ – विनोद गांधी

## आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या प्लास्टिक सर्जरी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परमपूज्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने व प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य हे ईश्वरीय कार्य समजून च होत आहे.येथे होणाऱ्या आरोग्य शिबिरांचा लाभ हजारो रुग्णांना मिळत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटल हे आरोग्य मंदिर आहे.येथे येणाऱ्या रुग्णाला उत्तम आरोग्य सेवा मिळावी यासाठी येथील सर्व डॉक्टर्स नर्सेस व स्टाफ निस्वार्थपणे आरोग्य सेवा देत आहेत.

सध्याच्या युगात न परवडणारा औषधाचा खर्च यामुळे अनेक रुग्णांना उपचार मिळणे अवघड झाले आहे. मोफत आरोग्य शिबिरांमुळे अनेक गरजू रुग्णांना दिलासा मिळत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्य शिबिराच्या माध्यमातून सेवेचा महाकुंभ सुरू आहे.असे प्रतिपादन उद्योजक विनोद गांधी यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३४ व्या पुण्यस्मृती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन सौ.उमा विनोद गांधी व गांधी परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन उद्योजक विनोद गांधी व सौ उमा गांधी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.याप्रसंगी अभिजीत गांधी,सौ.श्रुती गांधी,अभय गुगळे,सौ.नंदा गुगळे,सीए सोहन गुगळे,सुनील गुंदेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ. प्रकाश कांकरिया,सतिश लोढा,डॉ.आशिष भंडारी, माणकचंद कटारिया,वसंत चोपडा,प्रकाश छल्लाणी, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ. आदित्य दमानी,डॉ.मृदुला मुळे आदी उपस्थित होते.

श्रुती गांधी म्हणाले,गुरुदेव आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशिर्वादाने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.माता पितांची सेवा करणे या सोबतच समाजाप्रती आपले काही कर्तव्य आहे.समाजातील गरजू रुग्णांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.आरोग्य सेवेच्या माध्यमातून सेवा करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन ने गांधी परिवाराची निवड केली.हे गांधी परिवाराचे भाग्यच आहे. यापुढील काळातही आनंद विषयाची हॉस्पिटलच्या रुग्णसेवेच्या कार्यात गांधी परिवाराचे सहकार्य मिळत राहील.

प्रास्तविकात डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटल या आरोग्य मंदिराच्या उभारणी पासून च विनोद गांधी व गांधी परिवाराचे योगदान लाभत आहे.तसेच वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी या महत्त्वाकांशी शैक्षणिक प्रकल्पाला देखील गांधी परिवाराचे सहकार्य मिळाले आहे. याबरोबरच हॉस्पिटलचा दंतरोग विभाग सुरू करण्यासाठी गांधी परिवाराने मोठे योगदान दिले आहे. श्रुती गांधी यांचा जन्मदिवस दरवर्षी शिबिराचे माध्यमातून साजरा केला जातो.आनंदऋषीजी हॉस्पिटलचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे आहे.नगर जिल्ह्यातील २६० बेड्सचे हे पहिलेच हॉस्पिटल आहे.आत्तापर्यंत एक लाखाहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया नेत्रालय विभागाच्या मार्फत करण्यात आले आहेत.या शिबिरांसाठी समाजातील दानशूर व्यक्ती यांच्या सद्भावना सोबतच गांधी परीवार यांचे मोलाचे योगदान लाभत असते.

डॉ.आदित्य दमानी म्हणाले, दरवर्षी प्लास्टिक सर्जरी तपासणी शिबिरात गरजू रुग्णांची मोफत तपासणी व योग्य मार्गदर्शन केले जाते. यावेळी शिबिराच्या माध्यमातून कॅन्सरचे शस्त्रक्रिया सुरू केले आहे. कॅन्सरच्या रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा. प्लास्टिक सर्जरी शिबिरात लहान मुलांचे जन्मजात हातांच्या समस्या,व्यंग,मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, हातांच्या नसासंबंधीत आजार, दुभंगलेली ओठ व तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण, आणि लाल ग्रंथी समस्या व कर्करोगाच्या गाठीचे निदान व उपचार पांढरे चट्टे,तोंडाचे व्रण यावर औषध उपचार करण्यात येत आहे.या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा.

या शिबिरात ४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# अंबिकानगरमध्ये तेजस्विनी ब्राह्मण महिला संघातर्फे महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अंबिकानगर परिसरातील तेजस्विनी ब्राह्मण महिला संघातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. गेली बारा वर्षेसातत्याने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबवणार्या या संघाने यंदा महिला दिनाचे औचित्य साधत महिलांच्या कार्याचा सन्मान करण्यावर विशेष भर दिला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे सहा 'अन्नपूर्णा' महिलांचा सन्मान. या महिलांचा साडी देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या घरातील सर्व जबाबदार्या समर्थपणे पार पाडत ठरलेल्या वेळी इतरांच्या घरी जाऊन सुग्रास भोजन तयार करणार्या या महिलांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असून त्यांच्या परिश्रमाला योग्य तो मान देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.





यावेळी उपस्थित महिलांनी विविध मनोरंजक खेळांमध्ये सहभाग घेत आपले कलागुण सादर केले. वातावरणात उत्साह, आनंद आणि एकोप्याची भावना दिसून येत होती. कार्यक्रमात सौ. वसुधा देशपांडे यांनी 'स्त्रीच्या आयुष्यातील भावविश्व' या विषयावर इंद्रधनुष्याच्या प्रतीकातून प्रभावी मांडणी केली. स्त्रीच्या विविध नात्यांमधील तिच्या भावना, संघर्ष आणि सामर्थ्य यांचे त्यांनी सुंदर शब्दांत चित्रण केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. वैजयंती जोशी होत्या. कार्यक्रमास संघाच्या कार्यकर्त्या सौ. मनीषा शास्त्री, सौ. स्वाती वडाळकर, सौ. वृंदा चिंचोरकर यांच्यासह सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. वसुधा देशपांडे, सौ. संध्या पावसे, सौ. अमिता दसरे आणि सौ. मेघा कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि त्यांच्या योगदानाची दखल घेणारा हा उपक्रम उपस्थितांच्या मनात विशेष ठसा उमटवून गेला.

# संवत्सर वाचनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन; परंपरा जपणे ही काळाची गरज - पुरोहित अभिजीत औटी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी नगर तालुक्यातील नेप्ती येथे हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सालाबादप्रमाणे श्री हनुमान मंदिरात विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले. यामध्ये श्रीगणपती पूजन, इंद्रदेवता व वरूणदेवता यांची विधिवत पूजा ग्रामपुरोहित अभिजीत चंद्रकांत औटी ह्यांनी श्री.गोरख गडाख पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. यानंतर ग्रामपुरोहित अभिजीत औटी यांनी परंपरेनुसार संवत्सर फल वाचन केले. यंदाचे स्वस्ति श्री मनरूप शालिवाहन शक १९४८ असून 'पराभव' नाम संवत्सर असल्याचे त्यांनी सांगितले. या धार्मिक कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी दिली.

औटी कुटुंबीयांची ही आठवी पिढी असून गावामध्ये ग्रामपुरोहित म्हणून नारायण औटी व अमोल औटी हे पौरोहित्याची परंपरा अविरतपणे जोपासत आहेत. संवत्सर वाचनासोबतच वार्षिक ऋतुमानातील बदल दाते पंचांगानुसार ग्रामपुरोहित अभिजीत औटी यांनी सविस्तरपणे उपस्थितांना समजावून सांगितले. या मार्गदर्शनामुळे बळीराजाला शेती नियोजनासाठी निश्चितच लाभ होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. गुढीपाडवा या दिवशी संवत्सर फल वाचणे किंवा ऐकणे अत्यंत शुभ मानले जात असल्याने गावातील ज्येष्ठ नागरिकांसह तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या कार्यक्रमास जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी होळकर, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, पुरोहित अभिजीत औटी, गोरख गडाख, भाऊ पाटील होळकर, माजी चेअरमन मच्छिंद्र होळकर, बबन सय्यद, नामदेव बेल्हेकर, सिताराम बेल्हेकर, अर्जुन बेल्हेकर, भीमराज कळमकर, ऋषी खामकर, विलास होले, बाबासाहेब ठुबे, गुलाब राऊत, पांडुरंग जपकर, रावसाहेब पुंड, मारुती चौगुले, दगडू होळकर, भाऊसाहेब जपकर, अशोक जपकर, बाबासाहेब रावळे, गोरख जपकर, एकनाथ चौरे यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुढीपाडवा हा केवळ सण नसून आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि शेतीशी निगडित जीवनपद्धतीचा एक अविभाज्य भाग आहे. संवत्सर वाचनाच्या माध्यमातून वर्षभरातील पर्जन्यमान, ऋतू बदल आणि शेतीसाठी आवश्यक मार्गदर्शन मिळते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे नियोजन करण्यास मोठी मदत होते. अशा परंपरा जपणे ही आजच्या काळात अत्यंत गरजेची बाब आहे. संवत्सर वाचनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन व परंपरा जपणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन अभिजित औटी यांनी केले.

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहासाठी बडेवाडी सज्ज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भगवानगड–** श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक महंत वै.ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबा यांनी प्रारंभ केलेला ९२वा नारळी सप्ताह श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली यावर्षी पाथर्डी तालुक्यातील बडेवाडी या गावामध्ये मोठ्या थाटामाटामध्ये संपन्न होणार आहे. अन्नदान व ज्ञानदानाची दिवाळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नारळी सप्ताहाचा शुभारंभ मंगळवार ३१ मार्च २०२६ रोजी होत आहे. दरवर्षीप्रमाणे हा सप्ताह जसजसा जवळ येत आहे तसतसे परिसरामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण होत आहे. गावामध्ये सप्ताहाची जय्यत तयारी सुरू असून परिसरातील भाविकांमध्ये प्रचंड उत्साह पहावयास मिळत आहे. एकोणिसाव्या शतकात ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबांनी समाजातील अज्ञानरूपी अंधकार दूर केला. ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवानबाबांचा नारळी सप्ताह म्हणजे लहान–थोर, गरीब–श्रीमंत, विद्वान आणि सामान्यांचं एकत्रीकरण होय. संत–महापुरुषांचं एकत्रीकरण म्हणजे श्री क्षेत्र भगवानगडाचा नारळी अखंड हरिनाम सप्ताह होय. विचारांची देवाणघेवाण, तत्त्वज्ञानावर चर्चासत्र, अनेक महापुरुषांना अभिप्राय व्यक्त करण्याचे व्यासपीठ. सामान्यांचे एकत्रीकरण, एकत्र जेवण, निर्व्यसनीपणाचे प्रशिक्षण, जीवनाविषयीची गंभीरता, ईश्वराविषयी प्रेम, जीवन व संसाराची अनित्यता, सुख दुःखाची जाण, स्वतः विषयीचे ज्ञान व जगण्याचे भान देणारा हा अखंड हरिनाम सप्ताह असतो. संतांच्या ग्रंथांमधील न समजणारे सिद्धांत इथे समजून सांगितले जातात. भारताचा इतिहास व संस्कृतीचे विवेचन केले जाते. ऋषींचं मत व साधूंचं मनोगत इथे आचरणात आणण्याचे शिकविले जाते. आरोग्याची काळजी व योगप्रशिक्षण यात दिलं जातं. देव, भक्त व नाम ही त्रिवेणी म्हणजे नामसप्ताह होय. इथे वाल्याचा महर्षी वाल्मीक होतो. हीच संतांची प्रतिज्ञाही आहे.





या भव्य दिव्य सप्ताहासाठी बडेवाडी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली असून भाविकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी, आरोग्यसेवा, वीज, वाहतूक आणि निवास यांचे सुयोग्य नियोजन करण्यात येत आहे. शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, आणि ग्रामस्थ सर्वजण या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत. या सप्ताहासाठी देशभरातून लाखो भाविक उपस्थित राहणार असल्याने त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. हा नारळी सप्ताह केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक घडी बसवणारा एक आगळावेळा वेगळा सोहळा मानला जातो. सर्व जाती धर्मातील लोक एकत्र येऊन हा भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचा सोहळा साजरा करतात. सात्विक जीवनशैली, पर्यावरण पूरक उपक्रम आणि सामूहिक सहभाग ही या नारळी सप्ताहाची वैशिष्ट्ये आहेत. या सप्ताहासाठी राज्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक क्षेत्रातील नामांकित मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आपणही या भव्य दिव्य नारळी सप्ताहाचे साक्षीदार होऊन सप्ताहातील ज्ञानाने आपले जीवन उत्क्रांत करावे असे बडेवाडी ग्रामस्थांतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

# भर पावसात भीषण आग; 'ओमकार भांडी भांडार' जळून खाक





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील मेन रोड, बसस्थानक परिसरात गुरुवारी रात्री उशिरा भीषण आग लागून 'ओमकार भांडी भांडार' हे दुकान जळून खाक झाल्याची घटना घडली. भर पावसात लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच उपनगराध्यक्ष तुषार पाटील, नगरसेवक सुनील रासने, नगरसेवक ज्ञानेश्वर दहिवाळ, तसेच नगरपरिषदेचे कर्मचारी अशोक पगारे यांच्यासह स्थानिक नागरिक व दुकानदारांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सर्वांनी मिळून आग विझविण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले.

दरम्यान, अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत दुकानाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून व्यापाऱ्याला आर्थिक फटका बसल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेमुळे परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विद्युत सुरक्षेबाबत प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.